# ॥श्रीगुरुचरित्र निधी ॥

अध्याय पहिला(मंगळाचरण) ओवी क्रमांक ११

## ओवी :

कृपानिधी गणनाथा। ॐकारा विघ्नहर्ता।
विनायका अभयदाता। मतिप्रकाश करी मज॥ ११ ॥

## गद्यरुप :

कृपासिंधू गणनाथा, ॐकारा व विघ्नहर्ता ,
अभय देणारा विनायका, तू माझी बुद्धी प्रकाशित कर.

## शब्दार्थ :

| | |
|---|---|
| मति = बुद्धी | दाता= देणारा |

## शब्दार्थ चर्चा:

ॐकारा= आखू (उंदीर) वाहना =उंदीर ज्याचे वाहन आहे असा : हा अर्थ पोथीत दिलेला आढळतो.

श्रीगुरुचरित्रकार ' श्रीगणेशाला ॐकारा ' म्हणतात.

ज्ञानेश्वरीप्रमाणे ॐ म्हणजे अकार तो ब्रह्मा, उकार तो विष्णु, मकार महेश जाणियेला.
"देवा तूंचि गणेशु" या श्लोकाप्रमाणे ॐ म्हणजेच परमात्मा आणि गणेश हे त्याचे मूर्त स्वरुप होय. श्रीगुरुचरित्रकार व ज्ञानेश्वर माऊली श्रीगणेशाला ॐ कारा (म्हणजे परमात्म्याचे मूर्त स्वरुप) म्हणून संबोधताना आढळतात.

वाचकांनी आपली मते समर्पक कारणमीमांसेसहित pratisaadasg@gmail.com वर आपल्या नाव पत्त्यासहीत पाठवावीत ही विनंती.

# ॥श्रीगुरुचरित्र निधी ॥

## अध्याय पहिला(मंगळाचरण) ओवी क्रमांक ३५

**ओवी : नमन समस्त सुरवरां। सिद्धसाध्यां अवधारा।**

**गंधर्वयक्षकिन्नरां। ऋषीश्वरां नमन माझें ॥३५॥**

**गद्यरुप :** सर्व देवादिकांना, सिद्ध साध्य झालेल्यांना माझा स्थिर चित्ताने नमस्कार. गंधर्व ,यक्ष, किन्नर व ऋषि तसेच देव यांना माझा नमस्कार.

**शब्दार्थ : अवधारा = चित्ताची स्थिरता** ,ऋषीश्वरां = ऋषि + ईश्वर

(ऋषी /ऋषि =मुनी, साधू ,सात्विक ब्राह्मण, ज्ञानी, तपस्वी + ईश्वर = देव, भगवान )

**शब्दार्थ चर्चा :** या ओवीत **'अवधारा'** ह्या शब्दा ऐवजी **' विद्याधरा'** असा शब्द पोथ्यांमध्ये सुचविलेला आढळतो. वाचकांनी 'अवधारा' की 'विद्याधरा' ह्या पैकी योग्य शब्दाविषयी आपली मते समर्पक कारणमिमांसेसहित pratisaadasg@gmail.com वर आपल्या नाव पत्त्यासहीत पाठवावीत ही विनंती.